

ठाकरे सरकारने जाहिरातबाजीवर १६ महिन्यात खर्च केले १५५ कोटी

■ मुंबई

माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने महाविकास आघाडी सरकार स्थापनेपासून आजमितीला प्रसिद्धी मोहिमेवर करण्यात आलेल्या विविध खर्चाची माहिती मागितली होती. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने अनिल गलगली यांस ११ डिसेंबर २०१९ पासून १२ मार्च २०२१ या १६ महिन्यात प्रसिद्धी मोहिमेवर केलेल्या खर्चाची माहिती उपलब्ध करुन दिली. यात २०१९ मध्ये २०.३१ कोटी खर्च करण्यात आले असून नियमित लसीकरण प्रचारावर सर्वाधिक १९.९२ कोटींचा खर्च आहे. वर्ष २०२० मध्ये एकूण २६ विभागाच्या प्रसिद्धी मोहिमेवर एकूण १०४.५५ कोटी खर्च करण्यात आले. यात महिला दिनानिमित्त प्रसिद्धी मोहिमेवर ५.९६ कोटी खर्च करण्यात आले आहे. पदम विभाग ९.९९ कोटी, राष्ट्रीय आरोग्य अभियानावर १९.९२ कोटी, विशेष प्रसिद्धी मोहिमेवर ४ टप्प्यात २२.६५ कोटी खर्च करण्यात आले आहे. यात १.१५ कोटींचा खर्च सोशल मीडियावर दर्शविला आहे.

महाराष्ट्र नागरी विकास अभियानावर ३ टप्प्यात ६.४९ कोटी खर्च करण्यात आले आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाने निसर्ग चक्रीवादळावर ९.४२ कोटी खर्च केले असून यात २.२५ कोटींचा सोशल मीडियावर दर्शविला आहे. राज्य आरोग्य शिक्षण विभागाने १८.६३ कोटी खर्च केले आहे. शिवभोजनाच्या प्रसिद्धी मोहिमेवर २०.६५ लाख खर्च केला असून ५ लाखांचा खर्च सोशल मीडियावर दर्शविला आहे. वर्ष २०२१ मध्ये १२ विभागाने २९.७९ कोटींचा खर्च १२ मार्च २०२१ पर्यंत केला आहे. यात परत एकदा राज्य आरोग्य शिक्षण विभागाने १५.९४ कोटी खर्च केले आहे.

जल जीवन मिशनच्या प्रसिद्धी मोहिमेवर १.८८ कोटी खर्च केले असून ४५ लाखांचा सोशल मीडियावर खपविला आहे. महिला व बाल विकास विभागाने २.४५ कोटींच्या खर्चात २० लाख सोशल मीडियाचा खर्च दाखविला आहे. अल्पसंख्याक विभागाने तर कहर करत ५० लाखांपैकी ४८ लाख सोशल मीडियावर खर्च करुन टाकले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने ३.१५ कोटींच्या खर्चात ७५ लाख सोशल मीडियावर खर्च केले आहे.

वाशिममध्ये पोटनिवडणुकीसाठी वंचितची 'जनविकास'सोबत युती

■ वाशिम

वाशिम जिल्हा परिषदेच्या १४, तर सहा पंचायत समितीच्या २७ जागांसाठी येत्या १९ जुलै रोजी पोटनिवडणूक पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांचे निवडणुकीच्या समीकरणांची जुळवाजुळव सुरू आहे. वंचित बहुजन आघाडीने जनविकास आघाडीसोबत युती केली आहे.

या पोटनिवडणुकीत जिल्ह्यातील सर्वच जागेवर वंचित बहुजन आघाडी आणि जिल्हा जनविकास आघाडीची अधिकृत घोषणा वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष धैर्यवान फुंडकर यांनी केली आहे. ते येथे आजोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी जिल्हा जन विकास आघाडीचे नेते ॲड. नकुलदादा देशमुख उपस्थित होते. ओबीसी आरक्षण रद्द होण्यापूर्वी महविकास आघाडीसोबत वंचित आघाडी वाशिम जिल्हा परिषदमध्ये सत्तेत होती. मात्र, आता या निवडणूकीत वंचित आणि जनविकास आघाडी यांनी एकत्र लढवण्याचे ठरवले आहे. त्यामुळे सत्ताधारी महविकास आघाडीची डोकेदुखी वाढली आहे.

अनिल देशमुख यांची सुप्रीम कोर्टात याचिका दाखल

नवी दिल्ली- राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ईडीने तिसऱ्यांदा समन्स बजावले आहे. अनिल देशमुख यांना उद्या सोमवारी, ५ जुलै रोजी ईडीच्या कार्यालयात हजर राहण्याचे आदेश समन्सद्वारे बजावण्यात आले आहेत. याआधी दोन वेळा देशमुखांनी चौकशीसाठी उपस्थित राहू शकत नसल्याचे ईडीला कळवले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा समन्स बजावण्यात आलेत. ईडीच्या या कारवाईविरोधात देशमुखांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. ईडीने आपल्याविरोधात कारवाई करु नये, अशी मागणी करणारी याचिका देशमुखांनी सुप्रीम कोर्टात दाखल केल्याची माहिती त्यांच्या वकिलांनी दिली. त्यामुळे सुप्रीम कोर्ट काय निर्णय देते हे पाहावे लागणार आहे.

पुष्कर सिंह धामी यांनी घेतली उत्तराखंडच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

■ डेहराडून

पुष्कर सिंह धामी यांनी उत्तराखंडच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राजभवनात धामी यांना पद आणि गोपनीयतेची आज शपथ घेतली आहे. त्यांच्यासोबत सतपाल महाराज, हरक सिंह रावत या ज्येष्ठ नेत्यांनीही पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली आहे. तसेच वंशीधर, यशपाल आर्य, बिशन सिंह आणि सुबोध उनियाल यांनाही मंत्रिपदाची शपथ देण्यात आली आहे.

पुष्करसिंह धामी हे उत्तराखंडमध्ये भाजपच्या युवा मोर्चाचे प्रदेश अध्यक्षही होते. २००२ ते २००८ पर्यंत त्यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणून काम पाहिलं आहे. धामी यांचा जन्म टुंडी, पिथौरागड येथे झाला होता. त्यांनी पदव्युत्तर पदवी आणि वकिलीचं शिक्षण घेतलं आहे. त्यांना तीन बहिणी आहेत. त्यांचे वडील माजी सैनिक होते. उत्तराखंडमधील खटीमा विधानसभा मतदारसंघातून ते दोनदा विजयी झाले आहेत. २०१२ ते २०१७ पर्यंत ते आमदार होते. २०१७च्या विधानसभा निवडणुकीत ते पुन्हा निवडून आले. अवघ्या दुसऱ्या टर्ममध्येच त्यांना मुख्यमंत्रीपदाची लॉटरी लागली आहे. त्यांनी १९९० ते १९९९पर्यंत एबीव्हीपीमध्ये अनेक पदांवर काम केलं आहे. भाजयुमोच्या अध्यक्षपदी असताना सहा वर्ष राज्यात फिरून बेरोजगार तरुणांचं संघटन उभारल्याचा धामी यांचा दावा आहे. धामी हे खटीमा विधानसभा मतदारसंघातून दोनदा विजयी झाले आहेत. राज्यातील तरुण नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.

शिवाजीराव भोसले बँकेच्या ३ शाखा व्यवस्थापकांना बेड्या

■ पुणे

पुण्यातील औंध, कोथरूड आणि वडगाव-शेरी येथील शिवाजीराव भोसले सहकारी बँकेच्या तीन शाखांच्या तत्कालीन बँक व्यवस्थापकाला शिकारापूर पोलिसांनी आज अटक केली. प्रदीप निम्हण, नितीन बाठे आणि गोरख दोरगे अशी त्यांची नावे आहेत. पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व राष्ट्रवादीचे माजी प्रदेश उपाध्यक्ष मंगलदास बांदल यांच्याविरोधात दाखल झालेल्या तीन खटल्यांच्या चौकशीत या तीनही व्यवस्थापकांनी बांदल यांना कर्ज मंजूर केल्याचे पोलीस तपासात दिसून आल्याने शिक्रापूर पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. चौकशी दरम्यान कर्जाचे गैरप्रकार केले असल्याचे आढळले असल्याचे पोलिस निरीक्षक हेमंत शेगे यांनी सांगितले.

दत्तात्रेय रावसाहेब मंधारे यांच्या तक्रारीवरून २१ मे रोजी शिकरापूर पोलिस ठाण्यात बांदलविरोधात पहिला गुन्हा दाखल करण्यात आला होता. रविंद्र सातपुते यांच्या फिर्यादीवरून ३० मे रोजी दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला तर मंदार पवार यांच्या फिर्यादीवरून १ जून रोजी तिसरा गुन्हा दाखल करण्यात आला. वडगाव शेरी शाखेचे गोरख दोरगे, तर औंध शाखेचे प्रदीप निम्हण आणि कोथरुड शाखेचे नितीन बाठे या तीनही व्यवस्थापकांनी बांदल यांना नियमबाह्य पद्धतीने कर्ज मंजूर केल्याचे पोलीस तपासात दिसून आल्याने त्यांना शिक्रापूर पोलिसांनी अटक केली आहे. तर दुसरीकडे शिवाजीराव भोसले बँकेचा परवाना ही रिझर्व्ह बँकेने ४०० कोटींच्या गैरव्यवहार प्रकरणात रद्द केला आहे. दरम्यान, या तिन्ही प्रकरणांत बांदल यांच्यासह एकूण पाच जण न्यायालयीन कोठडीत असून तीन बँक अधिकाऱ्यांना शिरुर येथील विशेष दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले जाणार आहे. वरील तीन प्रकरणांमध्ये योग्य चौकशी केली जात असून पुढील पोलीस जिल्हा अधीक्षक अभिनव देशमुख व सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली जात आहे.

एकटाच प्रवास करणारा चिमुकला पालकांकडे सुपूर्द

■ मुंबई

पुणे ते मुंबईदरम्यान दि.२ जुलै रोजी धावणाऱ्या इंद्रायणी एक्स्प्रेसमध्ये लहान मुलगा एकटाच प्रवास करत असल्याचे लक्षात आले. रेल्वेच्या तिकीट निरीक्षकांनी तातडीने मुलाची चौकशी केली. मात्र, त्या गोंधळलेल्या मुलाला स्वत:ची माहिती देता येत नसल्याचे पाहून कर्मचाऱ्यांनी मुलाला आरपीएफच्या जवानांकडे सोपवले. त्यानंतर आरपीएफने पुढील तपास करत मुलाला पालकांकडे सुखरुप सुपूर्द केले.

ही घटना शुक्रवारी इंद्रायणी एक्स्प्रेसमध्ये घडली. इंद्रायणी एक्स्प्रेसमध्ये 'डी ८२ या बोगीत हा मुलगा बॅगसह एकटाच बसल्याची बाब समोर आली. कल्याण येथे ट्रेन थांबली असता, पालक आणि मुलामध्ये चुकामुक झाल्याचे पुणे विभागाचे वरिष्ठ तिकीट निरीक्षक राजेंद्र काटकर यांच्या ध्यानात आले. यानंतर रेल्वे कर्मचाऱ्यांकडून पुढील प्रक्रिया पूर्ण करत हा लहानग्याला पालकांकडे सोपविण्यात आले. कल्याण स्थानक येथे रेल्वेत बसलेला एकटा लहान मुलगा आणि बॅग पाहून नागरिकांमध्ये देखील गोंधळ सुरू झाला होता. त्यावेळी काटकर यांनी त्या मुलाची चौकशी केली.

बोगीमध्ये उपस्थित असणाऱ्यांकडे काटकर यांनी चौकशी केली असता, संबंधित मुलाला एका व्यक्तीने बोगीत बसवले. त्यावेळी रेल्वे सुरू झाली, मात्र ती व्यक्ती चढू शकली नसल्याचे सांगण्यात आले. तर मुलाला विचारणा केली असता, घाबरून रडत असलेल्या मुलाला त्याचे नाव सांगता आले नाही. या प्रकाराबाबत काटकर यांनी कंट्रोल ऑफिसमध्ये ही बाब कळवली. त्यानंतर दादर स्थानकात रेल्वे थांबल्यानंतर काटकर यांनी रेल्वे सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांकडे मुलगा आणि बॅग सोपवली. तर आरपीएफ जवानांनी या घटनेचा तपास करत संबंधित मुलाला परिवाराकडे सोपवले, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

कुंडी धबधब्यात बुडून १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू

■ पनवेल

तालुक्यातील कुंडी धबधब्याच्या पाण्यात बुडून एका तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना आज घटली आहे. हा तरुण आपल्या मित्रांसह वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी कुंडी धबधब्यावर गेला होता. त्यावेळी त्याचा पाय घसरून तो पडला आणि मोठ्या खड्ड्याच्या पाण्यात बुडून त्याचा मृत्यू झाला.

पनवेल तालुका पोलिस ठाणे हद्दीत कुंडी धबधबा आहे. येथे आज मुंबईतील शिवडी, सायन कोळीवाडा, चुनाभट्टी, खारघर येथील ६ मित्र फिरण्यासाठी गेले होते. सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास या सहा जणांपैकी मौसिन मुघल याचा आणि त्याचा मित्र सिद्धेश संजय माने (१९) या दोघांचा पाय घसरला आणि ते धबधब्याच्या खड्ड्यात पडले. या दोघांपैकी सिध्देश हा एका मुलाचा पाय पकडल्याने वाचला. परंतु खोल खड्ड्यातील पाण्यात बुडून मौसिनचा मृत्यू झाला. मौसिनला स्थानिक रहिवासी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने बाहेर काढून पनवेल जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. पण उपचाराआधीच त्याला मृत घोषित केले. मौसिन याचे वडील परदेशात कामाला असून तो एकुलता एक मुलगा होता.

निरलॉन लिमिटेड

(सीआयएन L17120MH1958PLC011045)
नोंदणीकृत कार्यालय: [illegible]
दूरध्वनी क्र.: + ९१ (०२२) ४०२८ [illegible] फॅक्स क्र.: + ९१ (०२२) ४०२८ [illegible]
ईमेल: info@nirlonltd.com, वेबसाइट: www.nirlonltd.com

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (सूचिबद्धता दायित्व आणि सूचिबद्धता आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन २९, ३३ आणि ४७ अन्वये कंपनीच्या संचालक मंडळाची आणि इतर समित्यांची बैठक शुक्रवार, १३ ऑगस्ट, २०२१ रोजी स. ११.०० (भा.प्र.वे.) वाजता इतर कामांसोबत, दि. ३० जून, २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिककरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष व मर्यादित पुनरावलोकन अहवाल विचारात आणि नोंदपटावर घेण्याकरिता घेण्यात येणार आहे.

कंपनी याद्वारे सूचित करते की, कंपनीच्या अंतर्गत आचारसंहितेनुसार सेबी (अंतर्गत व्यवहार प्रतिबंध) विनियमन, २०१५ [illegible] अन्वये व्यवहार नियमन, देखरेख आणि अहवाल देण्याकरिता प्रतिबंधीत कालावधी गुरुवार, ०१ जुलै, २०२१ ते मंगळवार, १७ ऑगस्ट, २०२१ पर्यंत असेल.

निरलॉन लिमिटेडसाठी
सही/-
जस्मिन के. भावसार
कंपनी सचिव, उपाध्यक्ष (कायदा) आणि अनुपालन अधिकारी
एफसीएस ४१७८
मुंबई, २ जुलै, २०२१

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई-निविदा सूचना क्रमांक २३/२०२१-२०२२ (मुंबई)

म.औ. वि. महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई-निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	कामांचे नांव	अंदाजित रक्कम रुपये
१.	मिलेनियम बिझनेस पार्क महापे सेक्टर ३ येथील इमारत क्र.७ मधील सामाईक जागेतील अग्निशमन यंत्रणेची विशेष दुरुस्ती करणे.	₹ ४८,५४,३१५.००
२.	मऔवि महामंडळाच्या डोंबिवली कर्मचारी वसाहत-महापे-वागळे इस्टेट ठाणे व्हाया ऐरोली ब्रीज व परत डोंबिवली या रुटकरीता १७ सिटर स्टाफ बसची सेवा १२ महिने कालावधीकरीता पुरविणे.	₹ ९,२४,०००.००
३.	रबाळे व ऐरोली येथील सांडपाणी उदंचनगृहाच्या छतावरील स्लॅबवर वॉटरप्रुफिंग ट्रिटमेंट करणे.	₹ २५,३७,६१३.००
४.	बारवी धरण पुनर्वसन कामांतर्गत कोळेवडखळ गावाकरीता भाडेतत्वावर डीजी सेटचा पुरवठा करुन डीजी सेटचे परिचालन करणे.	₹ ५,४५,६०४.००
५.	बदलापूर औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेच्या २२ केव्ही विद्युत उपकेंद्राकरीता भूमिगत येणारी वीजपुरवठा व्यवस्थेकरीता २२ केव्ही, ३ X ९५ चौ.मि.मी. केबलचा पुरवठा करणे.	₹ ६,५३,३०८.००
६.	अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील विद्युत उपकेंद्रातील पॅनेल बदलून, एएमएफ पॅनेल व मुख्य वितरण पॅनेलची दुरुस्ती व बदल करणे.	₹ ३,७७,७८४.००
७.	अंधेरी मरोळ येथील उद्योग सारथी इमारतीतील फायर हायड्रंट व फायर अलार्म सिस्टीम, पीए सिस्टीमची दोन वर्षे कालावधीकरीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे.	₹४१,५८,५३२.००
८.	शहाड पाणीपुरवठा योजनेच्या अशुद्ध उदंचन केंद्रातील २०० अश्वशक्ती व्हीटी पंपाची दुरुस्ती करणे व डोंबिवली येथील सांडपाणी निःसारण योजना टप्पा क्र.२ येथील उदंचनगृहातील पंपाची दुरुस्ती करणे.	₹११,७९,३६९.००
९.	अति.महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरुस्ती करणे.	₹ ४०,५४,९०१.००
१०.	बारवी धरण येथील वृश्रामगृहाची, उप विभागीय कार्यालयाची साफसफाई व देखभाल करणे.	₹ ७,५७,६८०.००
११.	मिलेनियम बिझनेस पार्क महापे सेक्टर ३ येथील इमारत क्र.७ मधील उद्वाहन बदलणे.	₹ ५३,२०,३०८.००

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०५/०७/२०२१ ते दिनांक १९/०७/२०२१ पर्यंत महामंडळाच्या **http://www.midcindia.org** या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक ०९/०७/२०२१ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १४/०७/२०२१ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

जा. क्र./का.अ.(मुख्या)/C87878/२०२१

परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका

ई-निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेच्या बसेसकरीता आवश्यक Exide Gold 1500-150 Amh. या साईजच्या ऑटोमोटीव्ह बॅटरीज खरेदीकामी मुळ उत्पादक, अधिकृत वितरक व पुरवठादार यांचेकडुन ई-निविदा मागविणेत येत आहे. सदरील ई-निविदा सूचना व निविदा प्रपत्रे दि. ०५/०७/२०२१ पासून दि. १२/०७ /२०२१ रोजी १५.०० वा. पर्यंत अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहेत. ई-निविदा दि. १२/०७/२०२१ रोजी १५.०० वा.पर्यंत स्विकारणेत येतील, व शक्य झाल्यास दि. १४/०७/२०२१ रोजी १६.०० वा. स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन पध्दतीने उघडण्यांत येतील.

ठामपा/पिआरओ/परिवहन/ २९८/ २०२१-२२ सही/-
दि.०२.०७.२०२१ परिवहन उप व्यवस्थापक
PLS VISIT OUR OFF.WEBSITE ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !

जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई शहर (३)

सक्षम प्राधिकाऱ्यांचे कार्यालय
महाराष्ट्र मालकी सदनिका कायदा, १९६३च्या कलम ५ए अन्वये,
[illegible]

क्र. [illegible] दिनांक: ३०.०६.२०२१

फॉर्म X

[illegible]

जाहीर सूचना

[illegible]

सही/-
जिल्हा उपनिबंधककरिता
सक्षम प्राधिकारी

रामेश्वर मिडीया

ई-लिलावाकरिता जाहीर उद्घोषणा
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ आणि ३३ अन्वये)

[illegible] https://ncltauction.auctiontiger.net [illegible]

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक	[illegible]
३.	प्राधिकरण, ज्याच्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणको स्थापित/नोंदणीकृत आहे.	कंपनी निबंधक, मुंबई (महाराष्ट्र)
४.	कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक	U45400MH2007PTC234297
५.	कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	[illegible]
६.	कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक	[illegible]
७.	परिसमापकाचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता आणि नोंदणीकरण क्रमांक	[illegible] IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246 liquidatorksspetron@vkcindia.com ip.vineetchaudhary@gmail.com [illegible]
८.	ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ	[illegible]
९.	ई-लिलावाचे संकेतस्थळ	https://ncltauction.auctiontiger.net
१०.	[illegible]	[illegible] liquidatorksspetron@vkcindia.com [illegible]
११.	[illegible]	[illegible]
१२.	[illegible]	[illegible]
१३.	[illegible]	liquidatorksspetron@vkcindia.com [illegible]
१४.	[illegible]	[illegible]

[illegible]

दिनांक: ५ जुलै, २०२१
ठिकाण: नवी दिल्ली

सही/-
[illegible]
परिसमापक
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रकरणात
IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246
liquidatorksspetron@vkcindia.com
ip.vineetchaudhary@gmail.com

जाहीर सूचना

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, माझे अशील हे **सौ. सुनिता विमल सेखानी आणि श्री. रिषभ कुमार सेखानी** यांच्याकडून सदनिका क्र. ४०१, मोजमाप ११२० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ, ४ था मजला, "विवेक [illegible]" इमारत, प्लॉट क्र. ए/१२, सीटीएस क्र. ५/१३, गुलमोहूर क्रॉस क्र. ७, जेव्हीपीडी स्कीम, मुंबई ४०००४९ ही सदनिका खरेदी करण्याकरिता वाटाघाटी करीत आहेत.

निम्न उल्लेखित सदनिकेच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, धारणाधिकार, वहिवाट, देखरेख किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असल्यास (उल्लेखित मालकांनी आरबीएल बँक, दादर शाखेकडून कर्ज खाते क्र. 809000990906 व्यतिरिक्त) कोणत्याही/ सर्व व्यक्ती/व्यक्तींनी आणि/किंवा वित्तीय संस्था/ संस्थांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पुष्ठ्यर्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतिसह **वकील, श्री. दिपेश जे. सांबला, कार्यालय क्र. ११२-ए, १ ला मजला, सुपरमार्केट सीएचएसएल, मोघीबाई रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** यांच्या कार्यालयात सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये सादर करावे, असे न केल्यास असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, कोणत्याही पुढील सूचनेशिवाय सोडून दिले आणि/किंवा गुंडाळून ठेवले असे समजण्यात येईल.

मालमत्तेची अनुसूची

सदनिका क्र. ४०१, मोजमाप ११२० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ, ४ था मजला, "विवेक [illegible]" इमारत, प्लॉट क्र. ए/१२, सीटीएस क्र. ५/१३, गुलमोहूर क्रॉस क्र. ७, जेव्हीपीडी स्कीम, मुंबई ४०००४९ आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधे सुसंगत सीटीएस क्र. ५/१३ किंवा साधारण तसेच धारण केलेल्या गाव विलेपार्ले पश्चिम, तालुका अंधेरीच्या प्लॉट क्र. ए-१२ धारण केलेल्या प्लॉटवर बांधलेली सदर इमारत.

सही/-
(दिपेश जे. सांबला)
वकील
दिनांक: ०५.०७.२०२१

जाहीर सूचना

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, माझे अशील हे **श्री. उदय सदानंद पारकर आणि सौ. ऊर्मिला उदय पारकर** यांच्याकडून सदनिका क्र. ५०१, मोजमाप ६५२ चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ, ५ वा मजला, [illegible] को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि., टिळक मंदिर रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ व त्यासह गच्ची मोजमाप ३०० चौ.फू. बिल्ट अप क्षेत्रफळ ही सदनिका खरेदी करण्याकरिता वाटाघाटी करीत आहेत.

निम्न उल्लेखित सदनिकेच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, धारणाधिकार, वहिवाट, देखरेख किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असल्यास (उल्लेखित मालकांनी आयसीआयसीआय बँककडून गृह कर्ज खाते क्र. LBMUM00000933602, टॉप अप कर्ज खाते क्र. LBTNE00001892458, टॉप अप कर्ज खाते क्र. LBTNE00001990214, टॉप अप कर्ज खाते क्र. LBMUM00001765117 आणि गहाणवट विमा खाते क्र. LBTNE00002071559 व्यतिरिक्त) कोणत्याही/ सर्व व्यक्ती/व्यक्तींनी आणि/किंवा वित्तीय संस्था/ संस्थांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पुष्ठ्यर्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतिसह **वकील, श्री. दिपेश जे. सांबला, कार्यालय क्र. ११२-ए, १ ला मजला, सुपरमार्केट सीएचएसएल, मोघीबाई रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** यांच्या कार्यालयात सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये सादर करावे, असे न केल्यास असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, कोणत्याही पुढील सूचनेशिवाय सोडून दिले आणि/किंवा गुंडाळून ठेवले असे समजण्यात येईल.

मालमत्तेची अनुसूची

सदनिका क्र. ५०१, मोजमाप ६५२ चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ, ५ वा मजला, [illegible] को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी लि., टिळक मंदिर रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७, व त्यासह गच्ची, मोजमाप ३०० चौ.फू. बिल्ट-अप क्षेत्रफळ आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधे नगररचना योजना विलेपार्ले क्र. I (बदललेला) चा प्लॉट क्र. ११० पूर्वीचा प्लॉट क्र. ११३ धारण केलेल्या, टी.पी.रेकॉर्डनुसार मोजमाप ७१५.७३ चौ.मीटर्स म्हणजेच ८५६ चौ. याईस आणि मालमत्ता नोंदणीकरण कार्डनुसार ७१३.७० चौ. मीटर्स म्हणजेच १४१.३० चौ. याईस किंवा साधारण तेवढ्याच प्लॉटवर बांधलेली सदर इमारत.

सही/-
(दिपेश जे. सांबला)
वकील
दिनांक: ०५.०७.२०२१

PUBLIC NOTICE

MR. ANKIT NAVIN SHAH & MR. CHINTAN NAVIN SHAH are members of RAJA INDUSTRIAL PREMISES CO-OP. SOCIETY LTD., Bearing Registration no. BOM/WT/GNL/C-1226/89-90 Dated 04.12.1989, having office at Purushottam Kheraj Road, Mulund (West), Mumbai – 400 080 and also the owners of Unit admeasuring about 925 Sq.Ft. area, Bearing No. 18 on the ground floor of the Building known as RAJA INDUSTRIAL ESTATE of the society at Purushottam Kheraj Road, Mulund (West), Mumbai – 400 080 (hereinafter referred to as the said 'Unit') and incidental thereto they are holding Ten shares of the society, Bearing Share Certificate No. 18, Distinctive Nos. 171 to 180 (both inclusive) (hereinafter referred to as the 'said shares'). They have reported having lost and misplaced one of the Original Link document and copy thereof i.e. Deed of Assignment lodged for registration with the Sub-Registrar, Kurla, MSD, under Serial No. BDR3/2038/97 on 17.07.1997, executed between M/s. BHAIRAV TRADERS and M/s. TEXOCHEM INDUSTRIES (hereinafter for the sake of brevity referred to as said 'Deed of Assignment') and the same could not be found after reasonable search and they have filed complaint with the Mulund Police Station, Mulund (West), Mumbai- 400080., for the loss of the said Original Deed of Assignment described hereinabove and the Officer in charge of the said Mulund Police Station had issued certificate, bearing No. 972/2021 Dated 03.07.2021.

Under instruction from my clients, I hereby invite claims or objections, if any from the public in general or other Claimant/s or objector/s for having possession of the said original Deed of Assignment and its copies and/or otherwise have any claims of whatsoever on said Unit & said Shares, they are hereby informed to write to me at my office at 201, Second floor, Parmeshwari Plaza, Netaji Subhash Road, Mulund (West), Mumbai – 400080 therewith relevant supporting documents within 14 days time from the date of publication of this NOTICE, failing which my clients shall presume that there are no encumbrances whatsoever in respect of the said Original Deed of Assignment related to the said Unit.

For M/s. MOHAN K. TATARIA & CO., ADVOCATES
Sd/-
MOHAN K. TATARIA
Mumbai. Dated: 05.07.2021